नि. फौ. खटला क्र. **<u>१७९/२०२२</u>**
सरकार विरूद्ध गणेश
**निशाणी २५**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव : अविनाश अरूण राउत,
वय : ३४ वर्षे
धंदा : शेती,
राहणार : वडद खुर्द, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी आरोपी गणेश श्रीराम भांडे याला ओळखत नाही. मला घटनेबाबत काहीच माहित नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. मी ब्रम्हपुरी रेती घाट पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/०३/२०२२ रोजी सकाळी ०८:०० वाजता सदर घाटातुन वाळुची चोरी होत असल्याचे समजल्याने मी जाउन पाहिले असता मला सदर घाटातुन ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ५०८१ व एमएच ३० जे ४७७९ ह्या ट्रॅक्टरद्वारे वाळु चोरी होत असल्याचे दिसले. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर ट्रॅक्टरचे माझ्या मोबाईल मध्ये फोटो घेतले होते.

३. मी माझे गावातील संतोष आंधळे याला नावाने ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, तो मला ट्रॅक्टरमध्ये वाळु भरतांना दिसला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला फोन करून घटनास्थळी बोलवले होते. आता मला माझे जाबाबातील अधारेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानात नमुद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकर्णी यांचेमार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०५.०३.२०२६
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.